**Government of Maharashtra – Agriculture Department**
**Project on Climate Resilient Agriculture**
**30, Arcade, World Trade Center, Cuff Parade, Mumbai-5**
Telephone no. – 022-22163351/2 E-mail: pmu@mahapocra.gov.in

**NDKSP-12041(22)/5/2026-12 3176711** **Date : Date of Digital Signature**

To,

______________________

______________________

**विषय : प्रकल्पासाठी आवश्यक टेलिफोन सिस्टीम (EPABX systems) मशिनची वार्षिक देखभाल व दुरूस्ती सेवेचा पुरवठादाराकडून एएमसी (A.M.C.) दरपत्रके मागविण्यात बाबत.**

1. आपणास खालील मशीनची वार्षिक देखभाल व दुरुस्तीची सेवा पुरवठा करण्यासाठी स्पर्धात्मक दर सादर करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मालाचे / साहित्याचे वर्णन | तांत्रिक निकष | संख्या | सेवा पुरवठा करण्यासाठीचा कालावधी | वार्षिक देखभाल करण्याचे ठिकाण | स्थापनेसाठी आवश्यकता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Panasonic TD 1232 PBX system with 48 Extension and Digital Phone with servic | वार्षिक देखभाल व दुरुस्ती | १ | दर महिन्यानंतर एकदा तसेच मशीनमध्ये बिघाड झाल्याच्या प्रसंगी | नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, 30 वा/ब-आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई 400005 | आवश्यकते-नुसार |

2. शासनास जागतिक बँककडून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पासाठी निधी मंजूर झालेला आहे. सदर निधी मधील काही रक्कम या दरपत्रकाअंतर्गत देण्यात येणाऱ्या पुरवठा आदेशांतर्गत करावयाच्या पात्र प्रदानासाठी वापरण्यात येणार आहे.

**Panasonic TD 1232 PBX system ची वार्षिक देखभाल व दुरुस्ती चा तांत्रिक निकष पुढीलप्रमाणे आहे.**

1. Panasonic TD 1232 PBX system cabinet Annual Maintenance Quotation (AMC)
2. Approx.48 Extension & Digital Phone with service

**3. निविदा किंमत**

अ. करार हा वरील नमूद केलेल्या मशीनच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती करून व मशीन कार्यरत करून देण्यासाठी असेल व त्यात काही बदल असू शकेल.

ब. वार्षिक देखभाल व दुरुस्तीकरिता आवश्यक सुट्ट्या भागांचा पुरवठा व कार्यान्वयनाच्या एकूण किंमतीमध्ये सर्व कर यांचा समावेश असेल.

क. वस्तू व सेवाकर वेगळा दर्शविण्यात यावा.

ड. निविदाकाराने सादर केलेले दर हे आदेशातील कालावधीसाठी स्थिर असतील व त्यात कोणत्याही कारणामुळे बदल होणार नाही.

इ. दरपत्रकातील दर हे भारतीय रुपयात सादर करावेत.

4. प्रत्येक निविदाकार एकच सीलबंद दरपत्रक सादर करेल. या दरपत्रकाबाबत निविदाकार इतर निविदाकारांशी संपर्क करणार नाही.

5. **दरपत्रकाची वैधता**

दरपत्रक सादर करावयाच्या अंतिम तारखेपासून 45 दिवसांपर्यंत दरपत्रक वैध राहील.

6. **दरपत्रकांचे तांत्रिक मूल्यांकन**

अ. "निविदाकाराने मागील तीन वर्षांच्या कालावधीत शासकीय विभाग/सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSU) येथे EPABX प्रणालीच्या वार्षिक देखभाल कराराचे (AMC) किमान एक कामाचे आदेश यशस्वीरित्या पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे. सदर कराराचा किमान कालावधी 12 महिने असावा."

ब. शॉप ॲक्ट लायसन्स.

तांत्रिक मूल्यांकनात बाद होणाऱ्या पुरवठादाराला संपूर्ण प्रक्रियेतून बाद करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

7. **दरपत्रकांचे आर्थिक मूल्यांकन**

खरेदीदार खालील बाबींबाबत निविदाकारांनी दिलेल्या प्रतिसादाची दरपत्रकांची तुलना व मूल्यांकन करेल.

अ. दरपत्रके योग्य प्रकारे स्वाक्षरी केलेले आहेत.

ब. दरपत्रकातील अटी, शर्ती व निकषांची पूर्तता करतात.

क. दरपत्रकातील सर्व वस्तूंची तुलना व मूल्यांकन एकत्रित करण्यात येईल. त्यानंतर सर्वात कमी दर असलेल्या (Least Cost Selection) दरपत्रकाची निवड करण्यात येईल.

ड. वस्तू व सेवाकर दरपत्रकांचे मूल्यांकन करण्यासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

8. **आदेश**

ज्या निविदाकाराचे दरपत्रक सर्वात जास्त प्रतिसादात्मक (Most Appropriate Bid) असून ज्याचे दर हे सर्वात कमी (Less) आहेत, त्या निविदाकारास आदेश देण्यात येईल.

8.1 खरेदीदारास कोणतेही दरपत्रक मान्य करण्याचा वा अमान्य करण्याचा अधिकार व दरपत्रकांची प्रक्रिया रद्द करण्याचा सर्व दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार करारनामा करण्यापूर्वी राहील.

8.2 ज्या निविदाकाराचे दर मान्य करण्यात आलेले आहेत त्यांस पुरवठा आदेश देण्यात येईल. मान्य केलेल्या दरपत्रकाच्या अटी पुरवठा आदेशामध्ये समाविष्ट करण्यात येतील.

8.3 पुरवठा कालावधी : पुरवठा आदेशाच्या तारखेपासून 1 वर्ष किंवा प्रकल्पाचा टप्पा 1 पूर्ण होईपर्यंत.

8.4 सेवापुरवठादाराची सेवा समाधानकारक वाटल्यास आवश्यकतेनुसार सदर सेवा पुढील कालावधीकरिता वाढविण्याचे अधिकार मा. प्रकल्प संचालक यांना राहतील.

9. **देयक अदा करण्याचे स्वरूप** : वार्षिक देखभाल दुरुस्तीचे देयक प्रत्येक तीन महिन्यांनी समाधानकारकरित्या काम पूर्ण झाल्याचा अहवाल प्रकल्पाच्या प्रशासन शाखेने दिल्यानंतर चार आठवड्यांच्या आत देयक अदा करण्यात येईल.

10. पुरवठा केलेल्या सेवेसाठी सामान्य व्यावसायिक हमी (Warranty/Guaranty) लागू राहील.

11. आपणांस विनंती करण्यात येते की, सोबत सहपत्रित केलेल्या दरपत्रक सादर करावयाच्या नमुन्यात आपले सीलबंद दरपत्रक दि. 27/10/2026 पर्यंत दुपारी 3:00 वाजेपर्यंत सादर करावे. सदर दरपत्रकाच्या लिफाफ्यावर दरपत्रकाचा विषय व दरपत्रक उघडण्याची तारीख व दिनांक नमूद करावयाचा. सदर दरपत्रक दि. 27/10/2026... रोजी दुपारी 03:30 वा. उघडण्यात येईल.

12. दरपत्रक सादर करताना तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा स्वतंत्रपणे सादर करणे आवश्यक आहे. एका लिफाफ्यात तांत्रिक व आर्थिक कागदपत्रे सादर केल्यास संबंधित पुरवठादाराला संपूर्ण प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

आम्हाला आशा आहे की, आपण आपले दरपत्रक सादर कराल तसेच, आपण या प्रक्रियेत इच्छा दाखविल्याबद्दल धन्यवाद.

Digitally signed by
Minal Karanwal
Date: 16-10-2026
14:29:33

(मिनल करनवाल), IAS
**प्रकल्प संचालक**

# दरपत्रक सादर करावयाचा नमुना
## (कंपनीचे लेटरहेडवर)

प्रति,

प्रकल्प संचालक,
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
30 आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,
मुंबई 400 005.

विषय :- टेलिफोन सिस्टम (**EPABX systems**) मशीनची वार्षिक देखभाल तसेच मशीन दुरुस्तीकरिता विविध पुरवठादारांकडून सीलबंद दरपत्रक.
संदर्भ : आपले पत्र जा. क्र. NDKSP-12041(22)/5/2026-12 /3176711 ________ दि. ________

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने टेलिफोन सिस्टम (**EPABX systems**) मशीनच्या वार्षिक देखभाल तसेच मशीन दुरुस्तीकरिता खालीलप्रमाणे सीलबंद दरपत्रक सादर करीत आहोत.

| अ.क्र. | वस्तूचे / मालाचे वर्णन | निकष | संख्या | एकक (युनिट) | वार्षिक देखभाल व दुरुस्तीची रक्कम (रुपये) | जी.एस.टी. दर (रुपये) | एकूण रक्कम (जी.एस.टी. सह) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **Panasonic TD 1232 PBX system with 48 Extension and Digital Phone with service** | वार्षिक देखभाल व दुरुस्ती | **1** | मशीन | | | |
| | **Total** | | | | | | |

**A) Annual Maintenance Quotation (AMC)**

- वरील तांत्रिक निकषाप्रमाणे टेलिफोन सिस्टम (**EPABX systems**) मशीनची वार्षिक देखभाल व दुरुस्तीची सेवा.
  एकूण किंमत रुपये ____________________ (अक्षरी रुपये ____________________)
  (जी.एस.टी.सह) व दरपत्रकात नमूद कालावधीमध्ये करण्यास आम्ही तयार आहोत.
- तसेच **AMC** कालावधीमध्ये सुटे भाग पुरवठा केल्यास मालासाठी सामान्य व्यावसायिक हमी (**Warranty/Guaranty**) लागू राहील याची आम्ही खात्री देतो.
- तसेच आम्ही प्रमाणित करतो की, आमच्यासाठी किंवा आमच्या वतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती ही भ्रष्ट मार्ग अवलंबणे, फसवेगिरी करणे, संगनमत करणे, दबावशाही करणे, अडथळा आणणे इ. बाबींचा अवलंब हे दर सादर करताना व करारनाम्याची पूर्तता करताना करणार नाहीत, याबाबत आम्ही योग्य त्या उपाययोजना केलेल्या आहेत.
- आमचा जी.एस.टी. क्रमांक ________________ आहे.

(पुरवठादाराची स्वाक्षरी/शिक्का)
नाव :
हुद्दा :
पत्ता :
दूरध्वनी क्र. :

दिनांक :
ठिकाण :